महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/०२९४९ दिनांक : ०९.०२.२०१८

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
परिमंडल कार्यालय,
**कोल्हापूर.**

**विषय :** वरीष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्नतीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्र. मुअ/कोप/मासंवि/ ६२८२ दिनांक ०९.११.२०१७.

.......

उपरोक्त विषयास अनुसरून, तांत्रिक अर्हता प्राप्त नसलेल्या विजसेवक यांना तंत्रज्ञ पदी सामावून घेण्यात आल्यानंतर त्यांचा विजसेवक पदावरील १ वर्षाचा अनुभव व तंत्रज्ञ पदावरील २ वर्षाचा अनुभव ग्राहय धरून त्यांना वरीष्ठ तंत्रज्ञ पदी पदोन्नती द्यावी किंवा कसे याबाबत आपण संदर्भिय पत्राव्दारे मार्गदर्शन मागविले आहे.

२. संदर्भित पत्रामध्ये आपण नमूद केलेल्या मुद्यांचे अवलोकन करून, आपणास कळविण्यात येते की, महावितरण वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५ मधील अनुसूची क-१ मधील वेनतगट ४ अंतर्गत अनुक्रमांक १(ii) मध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणीक अर्हता प्राप्त नसलेला कर्मचारी काम करीत असलेल्या संबंधीत क्षेत्रातील कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव धारण करीत असल्यास वरीष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्नतीसाठी पात्र ठरेल अशी तरतूद आहे. यास्तव विजसेवक पदावरील एक वर्षाचा अनुभव आणि तंत्रज्ञ पदावरील दोन वर्षाचा अनुभव ग्राहय मानून संबंधीतास वरीष्ठ तंत्रज्ञ पदी पदोन्नती देणे संयुक्तीक आहे.

३. सबब, वरील तरतुदी विचारात घेउन आपले स्तरावर योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**

कार्यकारी संचालक (मासं), मराविविकंम, सांघीक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई ४०० ०५१.